क्रमांक: एडीसी-२५१६/सीआर-४३/२०१६/तीन दिनांक :- १६ सप्टेंबर, २०१६

# घोषणा

## राज्य सेवा मुख्य परीक्षा २०१६ प्रवेश प्रमाणपत्राबाबत

जाहिरात क्रमांक ४४/२०१६, दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ नुसार आयोगामार्फत शनिवार, रविवार व सोमवार, दिनांक २४, २५ व २६ सप्टेंबर, २०१६ रोजी आयोजित राज्य सेवा मुख्य परीक्षा २०१६ करीता प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mahampsc.mahaonline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. प्रवेशप्रमाणपत्राची प्रत उमेदवारांनी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**२.** प्रवेशप्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या बॅक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, हुतात्मा चौक, फोर्ट, मुंबई ४०००01 येथील कार्यालयात व्यक्तीश: संपर्क साधावा. यासंदर्भात उमेदवाराला ०२२ - ६१३१६४०२ या दूरध्वनी क्रमांकावरुन आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

**३.** परीक्षेस प्रवेश मिळण्यासाठी परीक्षा झाल्यावर आयोगाशी संपर्क साधल्यास परीक्षेसाठी उमेदवारीचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

**४.** परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**५.**परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

ठिकाण: मुंबई

सु. ह. अवताडे
अवर सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.